# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** पालघर **P.S.(ठाणे):** भोईसर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0444 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 13/10/2023 10:03

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 12/10/2023
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 13/10/2023
**Time From (वेळेपासून):** 19:15 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 08:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 13/10/2023 **Time (वेळ):** 08:31 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 010
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 13/10/2023 08:31 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** बोईसर तारापुर रोडवर रुपरजत नगर, रुपरजत नगर,बोईसर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then .(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** लक्ष्मीकांत कुष्णा पिल्ले
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ओम नवकार बिल्डींग,काशिबाई वाडी पास्थळ,भोईसर,पालघर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ओम नवकार बिल्डींग,काशिबाई वाडी पास्थळ,भोईसर,पालघर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दर्शना दत्तात्रेय पिंपळे | | | 1. सोलंकी कम्प्लेक्स सी-2, रुपरजत नगर बोईसर,भोईसर, पालघर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | भावेश गणपत पिंपळे | | | 1. वसुली कारकुन,ग्रामपंचायत, कार्यालय,पाम ताजिपालघर, भोईसर,पालघर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., If any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक: 13/10/2023
मी श्री-लक्ष्मीकांत कृष्णा पिल्ले वय 38 वर्षे धंदा-खाजगी सिक्युरिटी व्यवसाय रा-बी/301, ओम नवकार बिल्डींग, काशिबाई वाडी, पास्थळ, बोईसर प- ता-जि-पालघर, मोबाईल क्र-8208998850 समक्ष फिर्याद लिहुन देतो की, मी वरील पत्यावर माझे परीवारासह राहत असून 11/सी, प्लॅट नं- 101, सोढी रेसीडेन्सी, वृंदावननगरी, पाम, बोईसर प- ता-जि-पालघर या भाडेतत्वावर घेतलेल्या ठिकाणी नव्याने खाजगी सिक्युरिटी पुरविण्याचा व्यवसाय सुरू करीत असून त्यासाठी आवश्यक असणारी कायदे'शिर प्रक्रिया मी प्ुर्ण करीत आहे- माझे सिक्युरिटीच्या व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या पी.ए.स-आर-ए लायसन्ससाठी मला पाम ग्रामपंचायतीच्या नाहरकत दाखल्याची आवश्यकता असल्यामुळे मी दिनांक 27/09/2023 रोजी पाम ग्राममपंचायत येथे नाहरकत दाखला मिळण्याकरिता आवश्यक असलेल्या कागदपत्रासह लेखी अर्ज केलेला आहे. त्यावेळी मला चार दिवसांनी येवून भेटा असे ग्रामपंचायतीच्या क्लार्क भावेश यांनी सांगितले होते.
त्याप्रमाणे मी चार दिवसांनी ग्रामपंचायत कार्यालयात जावून तेथील सरपंच पिंपळे मॅडम यांना भेटलो आणि त्यांना माझे सिक्युरिटीचे व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या नाहरकत दाखल्यासंदर्भात बोलणे केले त्यावेळी सरपंच पिंपळे मॅडम यांनी मला नाहरकत दाखला दे.याचे बदल्यात माझेकडे 1,00,000/-रूपयाची मागणी केली- परंतू मी नव्याने व्यवसाय सुरू करत असल्यामुळे मला ,एक लाख रूपये देणे 'शक्य होणार नाही, काही तरी कमी करा असे मी पिंपळे मॅडम यांना सांगितले- त्यावर त्यांनी मला किती दयायला 'शक्य होणार असे विचारले, त्यावेळी मी त्यांना पंधरा हजार रूपये देणे 'शक्य होईल असे सांगितले- त्यावर सरपंच पिंपळे मॅडम यांनी मला पंधरा हजारामध्ये काही होणार नाही, तुम्हाला 80,000/- दयावे लागतील असे सांगितले- परंतू ,एवढी रक्कमही मला देता येणार नाही असे मी पिंपळे मॅडम यांना सांगुन मला जास्तीत जास्त 20 ते 25 हजार देता येतील असे सांगितले-
त्यावेळी सरपंच पिंपळे मॅडम यांनी वीस ते पंचविस हजारामध्ये काही होणार नसून त्यांना ग्रामपंचायतीमधील ग्रामसेवक, उप सरपंच व इतर लोकांना पैसे दयावे लागतात असे सांगुन फायनल 60,000/-रूपयाची मागणी करून हयामध्ये काही कमी होणार नाही, 60,000/-रूपये दिल्यानंतरच नाहरकत दाखला मिळेल असे सांगितले- तसेच दिनांक 10/10/2023 रोजी पैसे घेवून येण्यास सांगितले- परंतू मला श्रीमती पिंपळे, सरपंच ग्रामपंचायत पाम यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक 09/10/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर कार्यालयातील श्री-दयानंद गावडे, पोलीस उप अधीक्षक यांना फोनद्वारे माझी तक्रार सांगितली- त्याप्रमाणे पोलीस उप अधीक्षक श्री-दयानंद गावडे यांनी मला दिनांक 10/10/2023 रोजी सकाळी 10ः00 वाजता बोईसर सरोवर हाॅटेल बोईसर पश्चिम येथे थांबण्याच्या सुचना दिल्या-
त्याप्रमाणे दिनांक 10/10/2023 रोजी पोलीस उप अधीक्षक श्री-दयानंद गावडे व पोलीस निरीक्षक श्री-'शिरिष चौधरी यांनी सरोवर हाॅटेल, बोईसर पश्चिम येथे येवून माझी भेट घेतली त्यांनी आपली ओळख सांगुन माझी ओळख करून घेवून 'शासकिय वाहनामध्ये बसण्याच्या सुचना दिल्या त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री-दयानंद गावडे यांनी मला त्यांचेसोबत असलेले, पोलीस निरीक्षक श्री-'शिरिष चौधरी, पोहवा/पागधरे, पोहवा/चव्हाण, चालक पोशि/गवळे तसेच त्यांचे सोबत असलेले दोन पंच साक्षीदार यांची ओळख करून दिली- त्यानंतर मला मराठी, हिंदी भाषा बोलता येते परंतू लिहिता येत नसल्याने मी माझ्या सांगण्याप्रमाणे तक्रार लिहून घेण्याची विनंती केली- त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री-चौधरी यांनी पोहवा/पागधरे यांना माझ्या सांगण्याप्रमाणे लेखी तक्रार लिहून घेण्याच्या सुचना दिल्या त्याप्रमाणे पोहवा/पागधरे यांनी माझ्या सांगण्याप्रमाणे माझी तक्रार पोलीस निरीक्षक श्री-चौधरी यांनी हिंदी भाषेत लिहून मला दोन्ही पंचासमक्ष समजावून सांगितली- ती बरोबर असल्याने मी सदरच्या तक्रारीवर सही केली आहे-
मी दिलेल्या तक्रारीचे अनुशंगाने लोकसेविका श्रीमती पिंपळे, सरपंच हया लाचेची मागणी करतात अगर कसे याबाबत पंचासमक्ष दिनांक 10/10/2023 रोजी पडताळणी करण्यात येणार असल्याचे पोलीस निरीक्षक श्री-चौधरी यांनी



Scanned with CamScanner

सांगितले- त्याप्रमाणे दिनांक 10/10/2023 रोजी पडताळणी पंचनाणाम्याची कायदेक्षीर कारवाई करून तसेच सरपंच श्रीमती पिंपळे हया ग्रामपंचायत कार्यालयात आहेत किंवा कसे याची फोनद्वारे खात्री केली त्यावेळी श्रीमती पिंपळे यांनी मला दुपारी 3 वाजता बोलाविले असल्यामुळे माझे अंगावर व्हाॅईस रेकाॅर्डर लावून मला पंच नं-01 यांचेसह लोकसेविका श्रीमती पिंपळे यांचे पाम ग्रामपंचायत कार्यालयात पाठविले- त्यावेळी मी लोकसेविका श्रीमती पिंपळे, सरपंच यांना भेटून माझे कामाच्या अनुशंगाने बोलणी केली असता, सरपंच श्रीमती पिंपळे यांनी मला पैसे आणले का? असे विचारले त्यावेळी मी त्यांना तुम्ही साठ हजार बोलले होते ते जरा जास्तच होतात मी माझ्या भावाकडून पैसे घेतले असून त्यात काहीतरी कमी करा त्यावर त्यांनी काही कमी होणार नाही, तेवढेच दयावे लागतील असे सांगितले- त्यानंतर मी त्यांना थोडया वेळात पैसे घेवून येतो असे सागितले असता, श्रीमती पिंपळे यांनी मला घेवून आले नाहीत का? असे विचारले त्यावेळी मी त्यांना थोडया वेळात येतो असे सांगुन पडताळणी पथकाजवळ परत आलो- त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री-चौधरी यांनी माझेकडील व्हाॅईस रेकाॅर्डर मध्ये रेकाॅर्ड झालेले संभाषा एेकले असता त्यामध्ये श्रीमती पिंपळे यांनी माझे खाजगी सिक्युरिटीच्या व्यवसायाकरीता लागणारी ,एन-ओ-सी- देण्यासाठी 60,000/- रू लाचेची मागणी करून ती थोडयाच वेळात ग्रामपंचायत कार्यालय पाम येथे घेवून येण्यास सांगितल्याचे निॅपन्न झाल्याने लागलीच सापळा कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री-चौधरी यांनी मला लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, मी माझ्याकडील 60,000/- रू रोख रक्कम पोलीस निरीक्षक श्री-चौधरी यांच्यासमोर हजर केली- सदरच्या लाचेच्या रक्कमेवर सापळापुर्व पंचनाम्याची कायदेशिर पूर्तता करून मी लाचेच्या रक्कमेसह व्हाॅईस रेकाॅर्डर लावून पंच नं- 1 यांच्यासोबत लोकसेविका श्रीमती पिंपळे यांच्या पाम ग्रामपंचायत कार्यालयात आलो तेव्हा श्रीमती पिंपळे यांनी त्या पिंटयाला विचारून सांगते, थोडा वेळ थांबा असे सांगुन त्यांनी त्यांच्या मोबाईलवरून पिंटया नावाच्या इसमाला फोन केला परंतू त्यांनी फोन उचलला नाही, त्यानंतर श्रीमती पिंपळे हयांनी आंम्हाला, तुम्ही येथे थोडा वेळ थांबा असे सांगुन त्या कार्यालयासमोर उभ्या असलेल्या कारमधून निघुन गेल्या त्यानंतर थोडया वेळाने ग्रामपंचायत कार्यालयातील ,का कर्मचारायास सरपंच श्रीमती पिंपळे यांनी फोन करून आम्हाला दुस-या दिवशी दिनांक 11/10/2023 रोजी 11-30 वा- ग्रामपंचायत कार्यालयात ये याबाबत निरोप दिला- त्यानंतर मी व पंच नं-1 असे परत 'शासकीय वाहनाजवळ आलोे- त्यावेळी त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री-चौधरी यांनी व्हाॅईस रेकाॅर्डरमधील रेकाॅर्ड झालेेले संभाषाण एेकले त्यामध्ये श्रीमती पिंपळे मला दिनांक 11/10/2023 रोजी 11-30 वा- ग्रामपंचायत कार्यालयात येण्याबाबत सांगितल्याचे निष्पन्न झाल्यामुळे दि- 11/10/2023 रोजी पुन्हा सापळा आजमाविण्यात येणार असल्याचे पोलीस निरीक्षक श्री-चौधरी यांनी सांगितले व आम्ही सर्वजण लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघार येथे पुढील कारवाईकरिता गेलो- सदर ठिकाणी सापळा कारवाईकरिता माझेकडील वापरण्यात आलेली लाचेची रक्कम ही पुन्हा सापळा कारवाई करिता वापरण्यात येणार असल्याने पोलीस निरीक्षक श्री-चौधरी यांनी सिलबंद करून त्यांचेकडील कार्यालयीन कपाटामध्ये ठेवून दिली- त्यानंतर मला दिनांक 11/10/2023 रोजी आलेवाडी मैदान, नवापूर रोड येथे हजर राहणेबाबत सांगुन माझे घरी पाठविले- त्याप्रमाणे दिनांक 11/10/2023 रोजी मी पोलीस निरीक्षक श्री-चौधरी यांच्या सांगण्याप्रमाणे आलेवाडी मैदान, नवापूर रोड येथे येवून सापळा पथकाची भेट घेतली- त्यानंतर पुन्हा सापळापुर्व पंचनाम्याची कायदेशिर कारवाई करून तसेच सरपंच श्रीमती पिंपळे हया ग्रामपंचायत कार्यालयात आहेत किंवा कसे याची फोनद्वारे खात्री केली त्यावेळी श्रीमती पिंपळे यांनी मला अध्र्या तासाने बोलाविले असल्यामुळे माझे अंगावर व्हाॅईस रेकाॅर्डर लावून मला पंच नं-01 यांचेसह लोकसेविका श्रीमती पिंपळे यांचे पाम ग्रामपंचायत कार्यालयात पाठविले- त्यावेळी सापळापथक माझे मागोमाग ग्रामपंचायत कार्यालयाचे आजूबाजूचे परिसरात कोणास संशय येणार नाही अशा पध्दतीने थंाबून राहिले- मी श्रीमती पिंपळे यांची भेट घेवून माझे कामाचे अनुशंगाने बोलणी केली असता त्यांनी मला पिंटया आल्यावर बघु असे म्हणुन त्याला फोन करण्यास सांगितले त्यावेळी मी त्यांच्याकडून पिंटया यांचा मोबाईल नंबर मागुन घेवून त्यावर फोन केला परंतू पिंटया यांनी माझा फोन घेतला नाही त्यानंतर थोडया वेळाने सरपंच श्रीमती पिंपळे यांना पिंटया यांना फोन करण्याची विनंती केली असता, त्यांनी पिंटया यांना फोन करून बोलणी करून सांगितले की, ते डहाणु येथे आहेत अध्र्या-पाउण तासात येतील त्यानंतर मी व पंच नं- 1 सदर ठिकाणी थांबून राहीलो- परंतू पिंटया हे सदर ठिकाणी आले नाहीत म्हणुन मी सरपंच श्रीमती पिंपळे यांना पुन्हा भेटून पिंटया फोन उचलत नाहीत तुम्ही माझे ,एन-ओ-सी चे काम करून दया असे सांगितले त्यावर त्यांनी पिंटया आल्यावर काय ते बघु असे सांगुून निघुन गेल्या- त्यानंतर मी व पंच नं- 1 असे तेथून निघुन 'शासकीय वाहनाजवळ आलो त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री-चौधरी यांनी व्हाॅईस रेकाॅर्डरमधील रेकाॅर्ड झालेेले संभाषाण ,एेकले त्यामध्ये मी सांगितल्याप्रमाणे हकिगत आढळून आली तसेच सायंकाळचे 5-00 वाजलेले असल्याने सरपंच श्रीमती पिंपळे हया कार्यालयातून निघुन गेल्या असण्याची 'शक्यता असल्यामुळे त्यांची पुन्हा भेट होणे 'शक्य नसल्याचे मी



Scanned with CamScanner

सांगितले त्यामुळे दिनांक 11/10/2023 रोजीची सापळा कारवाई स्थगित करून दिनांक 12/10/2023 रोजी पुन्हा सापळा कारवाई करण्यात येईल असे सांगुन मला आलेवाडी मैदान, नवापूर रोड येथे हजर राहणेबाबत पुन्हा सांगितले-
त्याप्रमाणे दिनांक 12/10/2023 रोजी मी पोलीस निरीक्षक श्री-चौधरी यांच्या सांगण्याप्रमाणे आलेवाडी मैदान, नवापूर रोड येथे येवून सापळा पथकाची भेट घेतली- त्यानंतर पुन्हा सापळापुर्व पंचनाम्याची कायदेशिर कारवाई करून तसेच सरपंच श्रीमती पिंपळे हया ग्रामपंचायत कार्यालयात आहेत किंवा कसे याची फोनद्वारे खात्री करण्यासाठी फोन करून बोलणी केली असता श्रीमती पिंपळे यांनी मला माझे कामाच्या अनुशंगाने उप सरपंच यांचेशी बोलून घ्या असे सांगितले परंतू उप सरपंच यांची माझेशी कधीही भेट झालेली नसल्यामुळे त्यांनी माझे कामाचे अनुशंगाने कधीही माझेकडे लाचेची मागणी केलेली नाही त्यामुळे फोन करण्याची आवश्यकता नसल्याचे सांगितले त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री-चौधरी यांनी सरपंच श्रीमती पिंपळे यांचेशी ग्ामपंचायत कार्यालय, पाम येथे जावून समक्ष बोलून सापळा आजमाविण्याचे ठरले त्याप्रमाणे माझे अंगावर व्हा ॅईस रेका ॅर्डर लावून मला पंच नं-01 यांचेसह लोकसेविका श्रीमती पिंपळे यांना भेटण्यास पाम ग्रामपंचायत कार्यालयात पाठविले- त्यावेळी सापळा पथक माझे मागोमाग ग्रामपंचायत कार्यालयाचे आजूबाजूचे परिसरात कोणास संशय येणार नाही अशा पध्दतीने थं ाबून राहिले- मी व पंच नं- 1 असे ग्रामपंचायत कार्यालय, पाम येथे जावून सरपंच श्रीमती पिंपळे यांची भेट घेवून कामाबाबत बोलली केली त्यावेळी त्यांनी त्यांच्या केबीनमध्ये बसलेल्या उप सरपंच यांचेशी बोलणी करण्यास सांगुन आतमध्ये निघुन गेल्या त्यावेळी उप सरपंच यांनी मला कामाबाबत विचारणा केली असता, मी त्यांना खाजगी सिक्युरीटी चालू करण्यासाठी ,एन-ओ-सी हवी असल्याचे सांगितले- त्यावर त्यांनी ते सरपंच मॅडम कडून घे असे म्हणुन माझा काही संबंध नाही असे सांगुन बाहेर निघुन गेले- त्यावेळी सरपंच श्रीमती पिंपळे हया मला भेटण्यास टाळाटाळ करीत असल्याने मी व पंच नं- 1 असे तेथून निघुन 'शासकीय वाहनाजवळ आलो-

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Umesh Mohanrao Patil(I (Inspector)) / Pi ~~शिरीष चौधरी~~ **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): ला.प्र.वि, पालघर

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of Jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

पोलीस ठाणे



Scanned with CamScanner

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.चौधरी यांनी व्हॉईस रेकॉर्डरमधील रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले त्यामध्ये श्रीमती पिंपळे यांनी मला जाण्यास सांगीतले नव्हते तरीही मी निघून आलो असल्याचे लक्षात आले. त्यामुळे मला पुन्हा लोकसेवक यांचेकडे पाठवून मागणी केलेल्या लाचेच्या संदर्भात बोलणी करून सापळा आजमाविण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्याप्रमाणे सापळापुर्व पंचनाम्याची कायदेशिर बाबीची पुर्तता करून माझे अंगावर व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच क्र.१ यांचेसोबत लाचेच्या रक्कमेसह पाम ग्रामपंचायत कार्यालयात पाठविले. त्यावेळी सरपंच श्रीमती पिंपळे हया क्लार्क भावेश यांच्या बाजूला बसलेल्या होत्या त्यावेळी मी त्यांचेशी माझे कामाचे अनुषंगाने बोलणी केली असता त्यांनी क्लार्क भावेंश कडे हाताने इशारा करून भावेशशी बोलण्यास सांगितले. त्यांच्या कामात व्यस्त असल्याने त्यांच्याशी बोलणे झाले नाही. त्यानंतर कार्यालयातील क्लार्क भावेश यांनी आम्हाला विचारणा केली. त्यावेळी पंच नं. १ यांनी एन.ओ.सी. करीता सरपंच मॅडम यांनी ६०,०००/– रू ची मागणी केलेली आहे. त्याप्रमाणे पैसे आणले आहेत परंतू सरपंच मॅडमनी अजून पैसे घेतले नाहीत असे भावेशला सांगीतले. त्यावर भावेश हा त्याच्याकडे पैसे दया असे बोलला. परंतू सरपंच मॅडमनी मला भावेशकडे पैसे देण्यास सांगीतले नसल्याने मी भावेशकडे पैसे दिले नाहीत. त्यानंतर भावेश हे कार्यालयाचे बाहेर जावून एक चारचाकी वाहन घेवून ग्रामपंचायत कार्यालयासमोर आले व त्यावेळी त्यांनी पंच नं.१ यांना सरपंच मॅडमनी पैसे त्यांच्याकडे देण्यास सांगीतल्याचे बोलले. त्यानंतर थोडयाच वेळात सरपंच श्रीमती पिंपळे हया कार्यालयाच्या बाहेर पडत असताना मी त्यांना मॅडम तुम्ही बाहेर जात आहेत का? त्यावर त्या हो म्हणाल्या. त्यावर मी त्यांना भावेशने थांबण्यास सांगितले आहे असे बोललो असता भावेश थोडया वेळाने येईल, त्याला भेटा असे मला सांगून त्या भावेश यांच्याकडील चारचाकी वाहनात बसून निघून गेल्या. त्यानंतर मी व पंच नं.१ असे तेथून निघून शासकीय वाहनाजवळ आलो.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.चौधरी यांनी व्हॉईस रेकॉर्डरमधील रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले त्यामध्ये श्रीमती पिंपळे यांनी कार्यालयातून निघून जाताना भावेश यांना भेटण्यास सांगीतले असून त्यांच्याशी फोनवरून बोलणी करणेबाबत सांगितले. त्याप्रमाणे मी पोलीस निरीक्षक श्री.चौधरी यांचे सुचनेप्रमाणे क्लार्क भावेश यांना फोन केला असता त्यांनी संध्याकाळी फोन करतो असे सांगून पैसे जवळ घेवून ठेवण्यास सांगीतले, व फोन ठेवला. बराच वेळ क्लार्क भावेश यांचा फोन येण्याची वाट पाहत थांबून राहिलो परंतू क्लार्क भावेश यांनी फोन केला नाही म्हणून मी पुन्हा पोलीस निरीक्षक श्री.चौधरी यांच्या सुचनेप्रमाणे क्लार्क भावेश यांना फोन केला असता त्यांनी मला बोईसर पश्चीम येथील अय्यप्पा मंदीरजवळ येण्यास सांगीतले.

त्याप्रमाणे माझे अंगावर व्हॉईस रेकॉर्डर लावून लाचेच्या रक्कमेसह पंच नं.१ यांच्यासोबत माझेकडील दुचाकीने अय्यप्पा मंदीर बोईसर प. येथे आलो. त्यावेळी सापळापथक माझे मागोमाग अय्यप्पा मंदीराचे आजूबाजूचे परिसरात कोणास संशय येणार नाही अशा पध्दतीने थांबून राहिले. सदर ठिकाणी मला भावेश पिंपळे हे दिसले नाहीत म्हणून मी त्यांना माझे मोबाईल नंबरवरून फोन केला. त्यानंतर ते थोडयाच वेळात माझे समोर हयुंडाई आय–१० कार घेवून आले. त्यावेळी त्यांच्याशी माझे कामाच्या अनुषंगाने थोडा वेळ बोलणे झाल्यानंतर त्यांनी कारचा ड्रॉवहर उघडून इशाऱ्याने लाचेची रक्कम कारच्या ड्रॉव्हरमध्ये ठेवण्यास सांगीतली. त्यावेळी मी माझेकडील लाचेची रक्कम माझे उजव्या हाताने काढून कारच्या ड्रॉव्हरमध्ये ठेवली. व माझे डोक्यावरून वारंवार हात फिरवून लाचेची रक्कम स्विकारल्याचा सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी लागलीच पोलीस उप अधीक्षक श्री.गावडे, पोलीस निरीक्षक श्री.चौधरी व सापळा पथकाने भावेश पिंपळे यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले. तसा सविस्तर सापळा पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी लोकसेविका श्रीमती दर्शना दत्तात्रय पिंपळे, वय ६० वर्षे, सरपंच, पाम ग्रामपंचायत, यांनी माझे सिक्युरिटीचे व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या ग्रामपंचायतीच्या नाहरकत दाखला देण्यासाठी दिनांक १०/१०/२०२३ रोजी ६०,०००/– रूपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम लोकसेवक श्री.भावेश गणपत पिंपळे, वय ४४ वर्षे, वसुली कारकुन, पाम ग्रामपंचायत ता.जि.पालघर यांनी दिनांक १२/१०/२०२३ रोजी दुपारी १९:१५ वाजताचे सुमारास अय्यप्पा मंदीर बोईसर प. येथील रोडवर कारमध्ये स्विकारली असताना लोकसेवक श्री.भावेश गणपत पिंपळे, वसुली कारकुन, पाम ग्रामपंचायत यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर कार्यालयाचे सापळा पथकाने रंगेहात पकडले आहे म्हणून माझी लोकसेविका श्रीमती दर्शना दत्तात्रय पिंपळे, वय ६२ वर्षे, सरपंच, पाम ग्रामपंचायत, व लोकसेवक श्री.भावेश गणपत पिंपळे, वय ४४ वर्षे, वसुली कारकुन, पाम ग्रामपंचायत ता.जि.पालघर यांचेविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे.

Scanned with CamScanner

14 **Signature/Thumb Impression of the complainant / Informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Umesh Mohanrao Pa
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** Pi

बोईसर पोलीस ठाणे जिल्हा पालघर

पोलीस ठाणे अंमलदार
बोईसर पोलीस ठाणे



Scanned with CamScanner